# 'एमसीव्हीसी' विद्यार्थीही घेणार उच्च शिक्षण

## व्होकेशनल युनिव्हर्सिटीचा अहवाल पावसाळी अधिवेशनात येणार विधिमंडळात

**पुणे : प्रतिनिधी**

'राज्यात किमान कौशल्यावर आधारित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे चार लाख आहे. या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी प्राप्त होण्यासाठी तयार केलेले व्यवसाय शिक्षण धोरण व स्वतंत्र व्यवसाय शिक्षण विद्यापीठ (व्होकेशनलयुनिव्हर्सिटी) याविषयीचा अहवाल तयार झाला असून, पावसाळी अधिवेशनात विधीमंडळापुढे मांडणार आहे,' अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री राजेश टोपे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सिंबायोसिस सेंटर फॉर डिस्टन्स लर्निंगच्या संचालिका स्वाती मुजुमदार यांच्या अध्यक्षतेखालील ११ सदस्यीय समितीने हा अहवाल तयार केला आहे. मंत्री टोपे यांच्याकडे हा अहवाल मुजुमदार यांनी सुपुर्द केला.

ते म्हणाले, राज्यात किमान कौशल्यावर आधारित (एमसीव्हीसी) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक मंडळाच्या समकक्षेतेचे (इयत्ता बारावीचे) प्रमाणपत्र मिळावे. त्यांना पुढील पदवीपर्यंतचे शिक्षण घेता यावे. या उद्देशाने हा अहवाल तयार केला आहे. या विद्यार्थ्यांनी बारावीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना इंजिनिअरिंग किंवा फार्मसी यांसारख्या तत्सम अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यायचा असेल तर ते विद्यार्थी राज्याची सामायिक प्रवेश परीक्षादेखील देऊ शकणार आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची दारे खुली होतील.

दरम्यान, राज्याच्या विधी व न्याय विभागाकडेही हा अहवाल पाठविण्यात येणार असून, त्यासबंधीचा कायद्याचा मसुदाही तयार आहे. या अधिवेशनात हा अहवाल मांडण्यात येईल. तत्पूर्वी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्यापुढे या अहवालाचे सादरीकरण करण्यात येणार आहे. एमसीव्हीसी या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येता यावे यासाठी समितीने तयार केलेल्या या अहवालावर शालेय शिक्षणमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी शिक्कामोर्तब केल्यानंतर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची मान्यता आवश्यक आहे.

### समितीच्या सूचना आणि शिफारशी

- ☐ औद्योगिक क्षेत्रासाठी कुशल, उच्चशिक्षित कामगार तयार व्हावेत.
- ☐ असंघटितकामगारांनाशिक्षणाच्या मुख्यप्रवाहात आणणे.
- ☐ उद्योगसंस्थांचा सहभाग हवा
- ☐ व्यवसाय शिक्षण देणाऱ्या संस्थांची गुणवत्ता सुधारणे.
- ☐ व्यवसायशिक्षण अभ्यासक्रमाचा समावेश ८ वी, ९वी, दहावी पासून करावा.
- ☐ दहावी विद्यार्थ्याला एक विषय ऐच्छिक असावा.
- ☐ सामायिक प्रवेश परीक्षा देता यावी.




**मंत्री राजेश टोपे यांना व्यावसायिक शिक्षण धोरणासंबंधीचा अहवाल समितीच्या अध्यक्षा स्वाती मुजुमदार यांनी सुपूर्द केला.**